संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
29 MAY 2026
प्राप्त झाले सही........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक संवर्गातील अधिकारी यांच्या विनंती बदलीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश :-संलेको-२०२६/प्र.क्र.८६/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९.०५.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, सहायक संचालक संवर्गातील (एस-२० : ५६१००-१७७५००) खालील विवरणपत्रात नमुद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ ३ मध्ये नमुद पदावर विनंती बदलीने पदस्थापना करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. शरद गंगाधर लोंढे, उपमहाव्यवस्थापक (वित्त), महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्या. मुंबई उपनगर | सहायक संचालक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई |
| २ | श्रीम. पुनम सुरेश धिंगाणे, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यवतमाळ | उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

२) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर *
३) संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
४) संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई *
५) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख *
६) संबंधित अधिकारी यांचे बदली कार्यालयाचे प्रमुख *
७) संबंधित अधिकारी *
८) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा.१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती कोषा.प्रशा.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)